## -: प्र क र ण :- पाचवे

ब) **बाळासाहेब देसाई यांचे गृहमंत्री म्हणून कार्य :-**

(५ डिसेंबर १९६३ ते १२ मार्च १९६७)

मुख्यमंत्री दादासाहेब कन्नमवार यांच्या निधनामुळे तारीख ५ डिसेंबर १९६३ रोजी ना. वसंतराव नाईक हे कांग्रेस पक्षनेते व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. दिनांक ४ डिसेंबर १९६३ रोजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी आपले मंत्रीमंडळ जाहीर केले व ५ डिसेंबर १९६३ रोजी दुपारी १ वाजता मंत्री-मंडळाचा शपथविधी कार्यक्रम पार पाडला. मुख्यमंत्र्यांनी मंत्रीमंडळात ना. बाळासाहेब देसाई यांना उपमुख्यमंत्रीपद देऊन महत्वाचे असे महाराष्ट्र राज्याचे गृहखाते त्यांचेकडे सोपविले.[१]

बाळासाहेब देसाई यांनी आतापर्यंत बांधकाम शिक्षण व शेतकी मंत्री या नात्याने महाराष्ट्र मंत्रीमंडळात यशस्वी कामगिरी केली होती. कर्त-व्यदक्षतेने आपलेवरील जबाबदारी जागरुकतेने पार पाडली. त्यामुळे बाळासाहे-बांच्याकडे गृहमंत्री पदाची जबाबदारी आली, त्यावेळी देशातील नव्हेतर महा-राष्ट्रातील परिस्थिती अतिशय कठीण व नाजूक होती. परिस्थितीचा फायदा घेऊन लोक देशात अराजक माजविण्याचा प्रयत्न करीत होते. चीनच्या दगाबाजीमुळे देशात तंग वातावरण निर्माण झाल होत. दारुबंदीसारख्या कायद्यांनी महाराष्ट्रात विशिष्ट परिस्थिती निर्माण झाली होती. काय-द्यातील अनेकविध पळवाटांनी कायद्याची जरब लोकांना राहिली नव्हती, गुंडाच्या वाढत्या उपद्रवाने सभ्य स्त्री पुरुषांना अनेक प्रकारचा त्रास सहन करावा लागत होता. अशा विशिष्ट व कठीण प्रसंगी महाराष्ट्र राज्यात कायदा व सुव्यवस्था ठेवण्याची जबाबदारी गृहमंत्र्यावर असते त्यामुळे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी गृहमंत्री पदाची जबाबदारी बाळासाहेब देसाई यांचेवर सोपविली.[२]

बाळासाहेब देसाई यांनी गृहमंत्री पदाची सुत्रं हाती घेतल्यानंतर कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची अनेक प्रकरणे निर्माण झाली. मुंबईच्या मधुसूदन मिलमधील गोळीबाराचं प्रकरण ( १५ डिसेंबर १९६३) मजासवाडी प्रकरण (मार्च १९६४) एस्.टी.कामगार संघ(१४ एप्रिल १९६४) औरंगाबाद स्फोट प्रकरण(८,९ जुलै १९६४) महाराष्ट्र बंद आंदोलन (१२ ऑगस्ट १९६४) युकॅरिस्टिक कॉंग्रेस (नोव्हेंबर १९६४) ~~महाराष्ट्र~~ व कुप्रसिध्द आंतरराष्ट्रीय गुन्हेगार बॉलकॉटच प्रकरण(१९६६) घेरा डालो व मुंबई बंद अशया अनेक घटना डिसेंबर १९६३ पासून ऑक्टोबर १९६६ पर्यंत घडत होत्या.[3]

या सा-या घटना बाळासाहेब देसाई यांची कसोटी पाहणा-या होत्या. राज्यातील एकंदर परिस्थिती स्थिर नसतानाही कायदा आणि सुव्यवस्था उत्तम राखण्याचे अवघड कार्य बाळासाहेब देसाई यांनी केले. बाळासाहेब रूपी पोलादी नेतृत्वाने हे काम केले म्हणूनच त्यांना त्या काळात मुख्यमंत्र्याचेच उजवे हात समजले जात होते.[४] गृहमंत्री असताना त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे.

### पोलीस खात्याला नवा दृष्टीकोन:-

गृहमंत्री या नात्यानं बाळासाहेबांची कारकिर्द गाजली, पोलीस खात्याला एक वेगळे वळण त्यांनी लावले. पोलीसांमध्ये परंपरागत दृढमूल झालेली प्रवृत्ती बदलली व पोलीसांना नवा दृष्टीकोन त्यांनी दिला. पोलीस म्हणजे जनतेचे रक्षणकर्ते मित्र आहेत त्यांच अंगीकृत पवित्र कर्तव्यकोणतं तर जनतेच्या जिविताच आणि वित्ताच रक्षण करणे होय. पोलीस सामान्य जनतेचे शत्रू नसून मित्र आहेत ही गोष्ट जगाला पटवायची असा एक नव्या विचार सरणीचा प्रयोग करुन पाहण्याचे गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांनी व मनाशी ठरविले होते. दुर्जनामध्ये दरारा व सज्जनामध्ये सौहार्द्र निर्माण करावं अशी बाळासाहेबांची अपेक्षा होती. हतबलांच्या साहयार्थ सारख धावल पाहिजे आणि दुष्टांच्या पाठीशी लागल पाहिजे ही त्यांची मनिषा होती. लोक-हिताची रखवालदारी पोलीसांनी जागरूकतेने पार पाडली पाहिजे असा बाळासाहेबांचा आग्रह होता.[५]

मुंबईला पोलिस व पोलिस अधिकारी यांच्या दहा हजारांच्या मेळाव्यात गृहमंत्री या नात्याने प्रथमच पोलीसांच्या पुढे बोलतांना ना. बाळासाहेब देसाई म्हणाले, " गृहमंत्री पदाची जबाबदारी स्विकारल्यानंतर आज तुमच्या पुढे बोलताना मला आनंद होत आहे. तुमच्या बरोबर राहून काम करणारा मी एक कार्यकर्ता आहे. आज पर्यंतची माझी भूमिका अशीच आहे. पोलीसांनी दुष्टाचे शत्रू व दुर्बलाचे मित्र बनले पाहिजे या भावनेने तुम्ही काम केले तरच आपण गरीबांची दु:खे हलकी करु शकू". अशाप्रकारे पहिल्याच मुलाखतीत ना. बाळासाहेबांनी पोलीस खात्याला नव्या विचाराची प्रेरणा देऊन अंत:करणे काबीज केली. व पोलीसांच्या कडून अनेक कामे करुन घेतली.[६]

मुंबई सचिवालयात तीन दिवस चालणा-या (६ ते८ जुलै १९६४) राज्य पोलीस अधिका-यांच्या परिषदेचे उद्घाटन करताना बाळासाहेब म्हणातात," ~~अशाप्रकारे पहिल्याच मुलाखतीत ना. बाळासाहेब~~ " लोकशाही जीवन पध्दतीत कायदयाचे राज्य प्रस्थापीत करण्याच्या कामी लोकांना मदत करण्याच्या दृष्टीने त्यांच्याशी मित्रत्वाचे संबंध ठेवा असे आवाहन गृहमंत्र्यानी पोलीस अधिका-यांना केले. पोलीसांनी जनतेचा विश्वास संपादन केल्या खेरीज त्यांना लोंकाचे सहकार्य लाभणार नाही यासाठी सर्व पातळीवरील पोलीसांनी अधिक कार्यक्षम बनले पाहीजे आणि त्यांची वागणूक सचोटीची राहिली पाहिजे" व पोलीसांनी बजावलेल्या उत्तम कामगिरी बद्दल त्यांनी त्याचे अभिनंदन केले.[७]

पोलीस दलास त्यांनी केलेले मार्गदर्शन, त्याचप्रमाणे पोलीस व जनता या दोहोमधील संबंध सलोख्याचे असले पाहिजेत. राज्यात शांतता व सुव्यवस्था राहीली पाहिजे. अशाप्रकारची त्यांची धडपड होती.

बाळासाहेब देसाई यांनी गृहमंत्री असताना अनेक प्रकरणे हाताळली त्यातील काही महत्वाची प्रकरणे पुढीलप्रमाणे.

**मधुसूदन मिल्सच गोळीबार प्रकरण:-**

बाळासाहेब देसाई गृहमंत्री पदाची सूत्रे हातात घेतात न घेतात

तोच मुंबईत मधुसूदन मिल्समध्ये (१३ डिसेंबर १९६३) गोळीबार प्रकरण निर्माण झालं व गृहमंत्र्यानी ते व्यवस्थित हाताळलं. देशात संप व निदर्शनांचं रान पेटवण्याची उध्दाम व धमकीची भाषा वापरणारांनीच बोनसबाबत कामगारात वसत असलेल्या असंतोषाचा फायदा आपल्या राजकारणासाठी करून घेतला व त्यातूनच मधुसूदन मिल्सच प्रकरण निर्माण झालं. विपर्यास झाल्यामुळे लाठीमार व गोळीबार या घटना घडल्या.[8]

मधुसूदन मिल्सच्या प्रकरणावर मुंबई विधानसभेत दि. १६ डिसेंबर १९६३ रोजी विधानसभेत चर्चा झाली. चर्चेच्यावेळी गृहमंत्री ना. बाळासाहेब देसाई यांनी जी संयमी व खंबीर भूमिका घेतली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन झाले. कामगाराबद्दल श्री. देसाई यांनी पूर्ण सहानुभूती व्यक्त केली. पोलिस जनतेचा सेवक असल्याचे सरकारी मतही त्यांनी स्पष्टपणे मांडले. कामगारांनी आपल्या न्याय व वाजवी मागण्यासाठी चळवळ करण्यास सरकारची कसलीच अडचण नाही पण लोकशाही राजवटीत या चळवळीला शांततेची मर्यादा असते.[9]

गिरणी कामगारांच्यावर करण्यात आलेल्या पोलीस गोळीबाराची मॅजिस्ट्रेरियल चौकशी चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट यांच्या नेतृत्वाखाली केली जाईल असे देसाई यांनी राज्य विधानसभेत जाहीर केले. पोलीस दल, कामगारावर केव्हाही अन्याय करणार नाही व गोळीबाराची गरज राहणार नाही असे वातावरण कामगार संघटनांच्या नेत्यांनी शहरात निर्माण करावे असे अवाहन त्यांनी केले.[10]

अशयाप्रकारे बाळासाहेब देसाई हे लोकशाहीच्या निरोगी व निकोप वाढीसाठी लोकांच्या न्याय व घटनात्मक हक्कांना महत्व देत होते. त्याचप्रमाणे देशद्रोही समाज कंटकांना या ना त्या सबबीखाली कणखर भूमिका घेवून निपटून काढले पाहिजे असा दृष्टीकोन बाळासाहेबांचा होता.

### मजासवाडी प्रकरण ( ८ मार्च १९६४ ) :-

गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांच्या कारकिर्दीत मजासवाडीचे दंगल

प्रकरण निर्माण झाले. मजासवाडी भागातील दंगल प्रकरण हे अनाधिकृत बांधकामाचे मालक आणि त्यांची कुळे यांच्यामध्ये निर्माण झाले व त्यातूनच दंगल उसळली.

मजासवाडीचे प्रकरण गृहमंत्री व पोलीस खात्याने यशस्वीरित्या हाताळले गोळीबार किंवा लाठीमार या मार्गाचा अवलंब न करता एका तासाच्या आत शांतता प्रस्थापित करण्याचे कार्य केल्याबद्दल त्या भागातील अधिकारी व पोलीसांना गृहमंत्री यांनी धन्यवाद दिले. राज्यसरकार, म्युनिसीपल कार्पोरेशन जमीन मालक, भाडेकरु यांच्या या संयुक्त प्रयत्नाद्वारे या प्रश्नाची सोडवणूक होऊ शकेल आणि या प्रयत्नांत सर्व राजकीय पक्षांनी खुल्या दिलाने सहकार्य दिले पाहिजे असे आवाहन बाळासाहेब देसाई यांनी मुंबई विधानसभेत बुधवार ता. ११ मार्च १९६४ रोजी केले.[११]

बाळासाहेब देसाई यांनी मजासवाडीचे प्रकरण उद्रेक होऊ न देता यशस्वीरित्या हाताळले त्याचप्रमाणे १४ एप्रिल १९६४ रोजीचा एस्. टी. कामगारांचा संप सुध्दा बाळासाहेब देसाई यांच्या कारकिर्दीत उत्तम त-हेने पार पाडला गेला.[१२]

### औरंगाबाद स्फोट प्रकरण :- ( ८ व ९ जुलै १९६४)

### बाळासाहेब देसाई यांची खंबीर व न्यायाधिष्टीत भूमीका :-

ना. बाळासाहेब देसाई यांच्या गृहमंत्री पदाच्या कारकिर्दीत भयानक स्वरूपाचे औरंगाबाद स्फोट प्रकरण बुधवार व गुरुवार दि. ८ व ९ जुलै १९६४ रोजी निर्माण झाले. औरंगाबादमधील राधामोहन मंदीरा-नजीक खोकडपूरा व बेगमपूरा भागात (कोकणपूरा) एका शोभेच्या दारुच्या साठ्यात फार मोठे स्फोट झाले पहिल्या स्फोटानंतर वीस तासाच्या अवधीत दुसरा स्फोटा झाला हा स्फोट इतका मोठा होता की आसपासच्या १५ इमारतींना भेगा पडल्या व ५० घरांचे मोठे नुकसान झाले. या स्फोटात पाकीस्तानचा हात आहे. देशात हेरगिरीच्या कारवाया वाढत आहेत, असा उलट सुलट प्रचार होऊ लागला. राज्याच्या सुरक्षिततेला आणि ऐक्याला धोका निर्माण होऊ लागला.[१३]

ना. बाळासाहेब देसाई यांनी स्फोट झाल्यानंतर तारीख१० जुलै १९६४ रोजी स्फोटक ग्रस्त भागात भेट दिली त्या भागाची फिरून पहाणी केली, आपदग्रस्तांची विचारपूस केली व दवाखान्यात जाऊन ते जखमींना भेटले प्राण व वित्तहानीने भयचकित झालेल्या जनतेला त्यांनी दिलासा दिला.[१४] त्यांच्या आदेशामुळे अधिका-यांनी तात्काळ उपाययोजना केली. या प्रकरणात बाळासाहेब देसाई यांनी जातीधर्माचा विचार केला नाही. मुसलमानांची धरपकड करून त्यांना तुरुंग भरता आले असते ना. बाळासाहेब देसाई यांच्या विवेक-शिलतेची व संयमशिलतेची वेळ होती त्या प्रकरणात त्यांची कसोटी होती. औरंगाबाद स्फोट हा तेथील लोकांच्या गाफील पणामुळे व मुर्खपणामुळे झाला आहे असे त्यांनी लोकांना समजावून दिले. गोंधळलेल्या जनतेला त्यांनी दिलासा दिला. त्यामुळे हळू-हळू लोकांच्यात विश्वास निर्माण होऊन शहरात पूर्ववत जीवन सुरु व्हायला मदत झाली. अशा प्रकारचे स्फोट पुन्हा होऊ नयेत याबददल दक्षता घेण्यासाठी त्यांनी सुचना केल्या.

स्फोटक द्रव्याचे परवाने धारकांच्या गुदामात परवान्याखेरीज बेकायदा व अनाधिकृत स्फोटक द्रव्यांचा साठा आहे का याची पाहणी करण्यासाठी राज्यातील पोलिस खात्याला हुकूम दिले आहेत. अशी माहिती मुंबई विधानसभेत गुरुवार दिनांक २९ जुलै १९६४ रोजी बाळासाहेब देसाई यांनी दिली व स्फोटाची चौकशी मॅजिस्ट्रेटमार्फत चालू केली. ११ जणांवर अरोप पत्र दाखल करण्यात आले.[१५]

ना. बाळासाहेब देसाई यांनी औरंगाबाद स्फोट प्रकरणाचा सर्वांग दृष्टीकोणातून विचार केला. विरोधकांच्या टिकेला न जुमानता प्रचार-अपप्रचारांच्या वावटळीला भीक न घालता गुन्हेगारला शासन झाले पाहिजे व विनाकारण इतरावर अन्याय होऊ द्यायचा नाही हा खंबीर दृष्टीकोन त्यांनी स्विकारला. पाकीस्तानी हस्तक म्हणून त्यांनी

कोणालाही पकडले नाही. स्फोट जागेला भेट देवून आपदग्रस्तांना मदत सहकार्य, विचारपूर्वक लोकांच्यात विश्वास निर्माण करून त्यांनी स्फोट प्रकरण हाताळले. परंतु ते न्यायाधिष्ठीत भूमिकेपासून तसूभर ढळले नाहीत.

महाराष्ट्र बंद:- ( १२ ऑगष्ट, १९६४) नामदार बाळासाहेब देसाई यांची खंबीर व संयमी भूमिका....

गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांच्या कारकिर्दीतील महाराष्ट्र बंद हे एक महत्वाचं प्रकरण आहे. विरोधी पक्षांनी व कामगार संघटनांनी अन्नधान्य टंचाई व भाववाढ याविरुध्द जनतेच्या भावना व्यक्त करण्याकरीता १२ ऑगस्ट १९६४ रोजी महाराष्ट्र बंदचा आदेश दिला होता. त्यानुसार एक दिवसाचा संप व हरताळ पाळण्यात आला.[१६]

राष्ट्र आणीबाणीच्या ( युध्दाच्या सावल्या पउल्या असता) अवस्थेतून जात असताना बंद आंदोलन योग्य नाहीत अशया कळकळीचा इशारा गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांनी आंदोलकांना दिला होता, त्यानुसार एक दिवसावा संप व हरताळ पाळण्यात आला. तथापि त्यांच्या कळकळीचा इशारा डावलून हेकटपणे महाराष्ट्र बंद आंदोलन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. आंदोलन काळात गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांनी जागत्या डोळ्यांनी समर्थ हातांनी आणि जनतेच्या जिव्हाळ्यापोटी आंदोलन काळातील परिस्थिती त्यांनी चांगल्या प्रकारे हाताळली. जनतेच्या रक्ताचा थेंब सांडू न देता परिस्थिती काबूत आणली.[१७]

महाराष्ट्र बंदच्या काळात कोणालाही अटक झाली नाही. मिरवणूका व संचार बंदी करणारे १४४ कलम लागू करण्यात आले नाही. राजकीय किंवा कामगार संघटनेच्या कुणा नेत्याला अटक करणेत आली नाही. शांतता व सुव्यवस्था कायम राखली गेली. बळाचा कमीत कमी व वापर करुन अशा चळवळींना तोंड द्यायचं व परिस्थिती चिघळू

चिघळू द्यायची नाही. उलट ती निवळू लागली. पाहिजे, अशी खंबीर बल टाकायची या पध्दतीचा पायंडा बाळासाहेब देसाई यांनी यशस्वी रित्या पार पाडला.

युकॅरिस्टिक काँग्रेस यशस्वी केली. :-
=====================

गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांच्या कारकिर्दीत ३८ वी आंतरराष्ट्रीय युकॅरिस्टिक काँग्रेस मुंबईमध्ये डिसेंबर, १९६४ ला यशस्वी रित्या पार पाडली.[१८] जागतिक प्रतिष्ठेचे ख्रिश्चन धर्मगुरु पोप पॉल हे स्वत: युकॅरिस्टिक काँग्रेससाठी आले होते. जगभर मुंबईत भरणारी युकॅरिस्टिक काँग्रेस गाजत होती. सा-या जगाचे लक्ष मुंबईकडे लागले होते त्यामुळे ना. बाळासाहेब देसाई यांच्यावरील जबाबदारी सामान्य राहिली नव्हती.

युकॅरिस्टिक काँग्रेसबद्दल काही मुठा-यांनी उलटसुलट प्रचार सुरु केला. काहीनी युकॅरिस्टिक काँग्रेस व धर्मांतर यांची सांगड घालण्याचा एका पत्राद्वारे प्रयत्न केला व पोप येतील तेंव्हा निदर्शने करण्याचा घाट घातला. युकॅरिस्टिक काँग्रेस यशस्वी व्हावी म्हणून बाळासाहेबांनी देसाई जागत्या डोळ्यांनी पहारा केला. उलट प्रचार होऊ लागल्यानंतर पोप महाशयांनी तातडीनं संदेश पाठवून कळविले की, भारताच्या वैभवशाली संस्कृतीशी संपर्क साधण्याच्या आतुरतेतून त्यांची भारतभेट निर्माण झाली आहे. त्यावेळी बाळासाहेबांनी हिंदू महासभेला निदर्शनाचा कार्यक्रम पाठीमागे घ्यायला लावला. व पोपच्या आगमनाचा हेतू सर्वांना समजावून दिला. युकॅरिस्टिक काँग्रेसची सर्व व्यवस्था श्री. बाळासाहेब देसाई यांनी स्वत: जातीनिशी पाहिली युकॅरिस्टिक काँग्रेस यशस्वी व्हावी म्हणून गृहमंत्र्यांनी व पोलीसांनी त्या काळात वीस-वीस तास काम केले. बाळासाहेबाचे पोलिस खाते रात्रदिवस राबत होते. काँग्रेससाठी जगाच्या काना कोप-यातून लोकांचा लोंढा मुंबईकडे सारख्या वेगाने वाहतहोता त्या सर्वांची सोय करणे, गैरसोय होऊ नये याबद्दल दक्षता घेणे, सर्वांशी सौजन्यशिलतने वागणे उपयोगी पडणे, यासंबधीचे खास आदेश गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांनी पोलिसांना दिले होते. देशोदेशीची माणसं आली होती वृत्तपत्र -

प्रतिनिधी आले आणि पोप पॉल ही आले, भारताचे राष्ट्रपती उपराष्ट्रपती व पंतप्रधान युकॅरिस्टिक कॉंग्रेससाठी उपस्थित राहिले, त्यामुळं पोलीसा वरील जबाबदारी आणखी वाढली. सबाचे स्वागत जनतेने माठ्या उत्साहाने केले सर्वांची देखभाल इतक्या तत्परतेने आणि तन्मयतेने भारतीयांनी केली की सर्वांनी मुक्तकंठानी भारताची, महाराष्ट्राची, भारतीय जनतेची आणि गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांची स्तुती केली.[१९]

युकॅरिस्टिक कॉंग्रेस करिता जवळ जवळ १ लाख लोक परदेशातून आले होते. इतका मोठा मेळावा भरला असताना देखील कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडला नाही किंवा चोरी झाली नाही. या वेळी सर्व पोलिस यंत्रणेने वाखाणण्याजोगी कामगिरी केली. ही गोष्ट सर्वांनी गौरवास्पद उद्गार काढले ही गोष्ट राज्यातील जनतेला भुषणास्पद आहे. अशी माहिती बाळासाहेबांनी मुंबई विधान सभेत दिली.[२०]

युकॅरिस्टिक कॉंग्रेसच्या वेळी गृहमंत्री बाळासाहेब देसाई व त्यांच्या पोलीसदलाने बजावलेल्या अद्वितीय कामगिरीबाबत आणि दाखविलेल्या सौजन्य शिलतेबददल पोप पॉल यांनी धान्यवाद दिले व बाळासाहेब देसाई यांना पोपनी अभिनंदनाची तार पाठवली, पोप महाशयांनी बाळासाहेब देसाई याचे अभिनंदन केले. युकॅरिस्टिक कॉंग्रेसच्या यशस्वीतेमुळे तेमुळे बाळासाहेबांच्या कामगिरीची प्रचिती परदेशात सुध्दा होऊ लागली. [२१]

अश्रुधूर पथकात वाढ:-
==============

बेकायदा जमाव आणि अव्यवस्था या विरुध्द पोलिस मार्फत बळाचा उपयोग कमीत कमी करावयाचा लोकांना शक्य तितका कमी त्रास होईल आणि त्यांना दहशत सुध्दा बसविता येईल. असा दृष्टीकोन बाळासाहेब देसाई यांचा होता. त्याचप्रमाणे कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित

करणे परंतु ते करण्यासाठी बंदूकाचा आश्रय घेण्याची या सरकारची नीती नाही व अगदी अपवादातील अपवाद म्हणून गोळीबार केला जावा अशा सक्त सुचना गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांनी पोलिसांना दिल्या होत्या. कमीत कमी बळाचा वापर करुन शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी त्यांनी अश्रुधूर पथकात वाढ केली.[२२]

घेरा डालो व मुंबई बंद आंदोलने ( २४ ऑगष्ट व २५ ऑगस्ट १९६६)

म्हैसूर राज्यातील मराठी भाषीक भाग सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी महाराष्ट्रात विलीन करावा या मागणीसाठी संपूर्ण महाराष्ट्र समितीने घेरा डालो हा सत्याग्रह आयोजीत केला होता त्याचप्रमाणे भाषवाद व बेळगांव संबंधीचा सीमा तंटा (कर्नाटक प्रश्न सोडवणेसाठी ) या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मुंबई बंद चा बेत समितीच्या कार्यकर्त्यांनी आखलेला होता. सचिवालयात जाणा-या व सचिवालयातील कर्मचा-यांना घेरा घालून त्यांना नोकरीवर जाण्यापासून परावृत्त करावयाचा, मंत्री-पुढारी सदस्य यांना सचिवालयात जाऊ द्यायचे नाही अशा प्रकारे घेरा डालो आंदोलन त्यांनी यशस्वीपणे पार पाडले. मुबई बंदच्या वेळी साठ-सत्तर हजार लोकांचा मोर्चाचा कार्यक्रम झाला.[२३]

गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांनी घेरा डालो सत्याग्रह लोकशाहीच्या तंत्राने व मंत्राने अत्यंत कौशल्याने हाताळला त्यामुळे आंदोलनाच्यावेळी कोठेही संघर्ष उडाला नाही. आंदोलन व्यवस्थीत पार पडले. मुंबई बंदचा मोर्चा " भाषावाद" व सीमावाद या संदर्भात होता. लोकांच्या भुकेचा, भावनेचा प्रश्न होती. जनतची भूक आणि भावना याविषयी पोलीसांनी आदर दाखवावा त्याचप्रमाणे पोलिसांनी कमालीच्या संयमाची भूमिका पार पाडायला हवी, कायदा, शांतता व सुव्यवस्था यांचा भंग होऊ न देण्याच कर्तव्य पोलिसांनी पार पाडायला हवे, बंदूकीतून गोळी सुटता कामा नये, लाठी उचलली जाता कामा नये, अदर्श संयमाची शपथ घेउन माझ्या पोलिसांनी मुंबई बंद प्रसंग पार पाडला पाहिजे असे मार्गदर्शन बाळासाहेबांनी पोलिस दलाच्या वरिष्ठ आणि कनीष्ठ

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

अधिकाऱ्यांना केले पोलीस सामान्य जनतेचे शत्रू नसून मित्र आहेत ही गोष्ठ जगाला पटवायची अशा एका नवीन विचारसरणीचा प्रयोग करून पाहण्याचं गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांनी ठरविलं होतं.[२४]

२४ व २५ ऑगष्ट १९६६ चे आंदोलन कार्यक्रम ठरल्याप्रमाणे पार पडले. बाळासाहेबांच्या पोलिसदलास अशा काही आदर्श संयमाच आचरण केले की मोर्चाच्या जागी तर कोणताही अनिष्ठ प्रसंग झाला नाही. परंतू मुंबई शहरात कुठेही जनता आणि पोलीस यांच्यात संघर्षाचा एकही प्रसंग उद्भवला नाही.[२५]

गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांच्या या धोरणामुळे त्यांची विरोधी पक्षातही लोकप्रियता वाढू लागली सामान्य पोटार्थी जनतेवर गोळी चालवायला त्यांना होत नाही. " मुंबई बंद" प्रसंगी त्यांनी गोळीबार केला नाही. म्हणून त्यांच्यावर टिका करणाऱ्यांना त्यांनी दिलेले उत्तर त्यांच्या कणखर धोरणावर प्रकाश टाकते " मुंबई बंद" दिनी पूरेसे पोलीस संरक्षण न दिल्याचा निषेध म्हणून मुंबईच्या तीन मंत्र्यानी व १९ आमदानांनी( ( सारे मुंबई कॉंग्रेसचे) राजीनामे दिले त्याला बाळासाहेबांनी दिलेले उत्तर लोकशाही राज्याच्या इतिहासात आदर्श म्हणून नमूद होईल.[२६]

" बदलत्या परिस्थितीत पोलीसांचा दृष्टीकोन बदलावा म्हणून आपण आग्रह धरतो पण तो बदलल्या तर मात्र आपण त्याचे कौतुक करत नाही याचे मला आश्चर्य वाटते. लोकशाही राज्यपध्दतीचा स्विकार केल्यानंतर विरोधी राजकीय चळवळीचा बंदोबस्त करण्याच्या मार्गातही बदल होणे अपरिहार्य नाही काय ? गोळीबार करणे हे अखेरचे शास्त्र आहे. हे विसरुन चालणार नाही, सरकार संयमाने वागेले व मुंबईतील रस्ते रक्ताने माखले नाहीत याबद्दल कोणी दोष दिला तरी त्यात सरकारला लाज वाटण्याचे कारण नाही असे बाळासाहेबांचे सडेतोड उत्तर होते."[२७]

चोरटा व्यापार करणारा कुप्रसिध्द बॉलकॉट:-

चोरटा व्यापार करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळ्या होत्या, टोळी-

वाल्यांच्या सूत्रधारांपैकी कुप्रसिध्द बॉलकॉट हा एक प्रमुख होता. जगाला सतावणा-या व पोलीस खात्याला चकावून सोडणा-या या बॉलकॉटला पकडण्याच्या संदर्भात गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांनी लक्ष घातलं. खात्याला सुचना केल्या, पोलिस खात्यानं बुध्दिकौशल्य पणाला लावले आणि बॉलकॉट सारख्या बिलंदर आणि हिक्कमती माणसाला पकडण्याचा विक्रम महाराष्ट्राच्या पोलिस खात्याने केला त्यामुळे लंडनच्या स्कॉटलंड यार्ड या जगप्रसिध्द गुप्त पोलीस खात्याने गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांना खास संदेश पाठवून त्याचे अभिनंदन केले.[२८]

इंग्लडच्या प्रख्यात स्कॉटलंड यार्डच्या पोलीसांना जो बॉलकॉट सापडू शकला नाही तो मुंबईच्या पोलीसांनी अतिशय बहादुरीने पकडला.[२९]

बाळासाहेब देसाई यांच्या कारकिर्दीतील हे एक महत्वाचे काम आहे.

गृहमंत्री बाळासाहेब देसाई याचे गृह खात्यात नवे संकेत नवी पध्दती:-

यापूर्वी मोर्चे, हरताळ, बंद वगैरे प्रकार झाले की, अश्रुधुराचा वापर व लोकसमुदायावर गोळीबार करणे ह्या उपाययोजना सामान्यपणे होत असतं. चार-दोन मुडदे पाडल्याशिवाय चळवळी, निर्दशनें पैलतीरास पोहचत नसतं. पाशवी बळाचा जास्ती जास्त वापर होत होता. बाळासाहेब देसाई गृहमंत्री असताना त्यांनी गृहखात्यात नवी पध्दती सुरु केली, व नवे संकेत निर्माण केले, त्यामुळे महाराष्ट्रातील या पध्दती सबंध देशाला स्विकाराव्या लागल्या. विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांवर चॅप्टर केसेस भरावयाच्या नाहीत, शांतपणे निदर्शने करणा-या मोर्चे काढणा-या जमावात बंदी करावयाची नाही, हे निर्णय त्याचे होते.[30] महाराष्ट्र बंदच्या वेळी त्यांनी घेतलेली खंबीर व संयमी भूमिका व अन्य राज्यातील बंदचे चित्र याचा विचार करता बाळासाहेब देसाई यांच्या प्रशासकीय कौशल्याची प्रचिती येते.

बाळासाहेब देसाई यांची भूमिका अतिशय संयमशील व पूर्ण विवेकशील होती. बळाचा अतिशय मर्यादित वापर आणि तोही जेंव्हा अगदी नाईलाज होईल तेव्हाच. आंदोलनातील हुल्लडबाजांनी प्रसंगी पोलीसावर दगडफेक केली तरी पोलीसांनी पाशवी बळाचा वापर न करता तो हल्ला सहनशिलतेने लोकहितासाठी देशहितासाठी शक्यतो सोसावा अशी पोलीसामध्ये निर्माण

केलेली वृत्ती प्रवृत्ती ही बाळासाहेबांच्या राज्याला व राष्ट्राला मोठी देणगी आहे. परिस्थिती हाताळण्याचं हे कौशल्य अप्रतिम आहे संकल्पाच्या सिध्दीसाठी ते स्वत:वर संकटही ओढवून घेतात.[31]

पोलीस कमिशनर विभागांची वाढ:-

वाढती लोकसंख्या शहराच्या परिसरात होणारा औद्योगीक विकास यामुळे रहदारी, सुरक्षा, शांतता इत्यादी क्षेत्रात उत्पन्न होणारे नवे वाढते प्रश्न सोडविण्यासाठी त्याचप्रमाणे जनतेला शांतता व न्याय मिळवून देणे, सुरक्षितता टिकवणे इत्यादी उद्देशाने गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांनी पोलिस कमिशनर विभागांची वाढ केली. १९६२ साली लाल बहादूर शास्त्री यांनी मोठ्या शहरासाठी पोलिस कमिशनरांची नियुक्ती करावी असे सुचवले होते. या योजनेची कार्यवाही भारतात प्रथम महाराष्ट्र राज्यात झाली. पुणे शहरात पहिल्या पोलिस कमिशनर कार्यालयाचे उद्घाटन दिनांक १ जुलै १९६२ रोजी गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांनी केले व पोलिस यंत्रणेला गतीमान करण्याचे काम त्यांनी केले.[32]

बाळासाहेब देसाई यांनी राज्याच्या अनेक आर्थिक अडचणी असतानाही पुणे, नागपूर व औरंगाबाद या पोलिस कमिशनर विभागांची वाढ केली.[33]

पोलिसांना सवलती व पोलिसांच्या निवासाची सोय :-

पोलिस खात्यातील कर्मचा-यांनी व सेवकांनी आपण जनतेचे संरक्षणकर्ते आणि मित्र आहोत अशा भूमिकेवरुन आपली नोकरी बजावली पाहिजे. हा बाळासाहेबांच्या दृष्टीकोनाचा भाग होता. त्याचप्रमाणे पोलिस दलातील सर्व नोकरांचे जिवित शक्य तितक्या सर्व सोयींनी समृध्द असले पाहिजे हा दुसरा भाग होता. म्हणून पोलिसांच्यासाठी उत्तमपैकी घरांची बांधणी करण्यात आली पाहिजे अशी योजना बाळासाहेबांनी आखली तो कार्यान्वीत करण्याचा प्रयत्न केला.[34]

पोलिसांच्या कल्याणाबाबत मुंबई विधानसभेत माहिती देताना बाळासाहेबांनी या राज्यात ६६ हजार ३९१ पोलिस आहेत. त्यापैकी ४० हजार २३८ पोलिसांना सरकारने स्वत:च्या मालकीची किंवा भाड्याची घरे दिली आहेत. १९६३-६४ साली १ कोटी १ लाख ८५ हजार ४३७ रुपयांचा व १९६४-६५ साली १ कोटी ३८ हजार ४१६ रुपयांचा कार्यक्रम घरे बांधण्यासाठी घेतला आहे. पोलिसांना जास्तीजास्त घरे मिळावीत या दृष्टीने शासना-कडून प्रयत्न होत आहेत. कोणत्याही परिस्थितीत त्यांना सुटेबल घरे मिळावीत अशी भूमिका आहे अशी माहिती बाळासाहेब देसाई यांनी पोलिसांच्या कल्याणाबाबत बोलतनाना मुंबई विधानसभेत २५ एप्रिल १९६६ रोजी दिली.[३५]

गृहमंत्री बाळासाहेब देसाई यांनी पोलिसांना घरे मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत.

जबाबदारीची कामे पार पाडणा-या जनतेच्या जिवीत वित्ताचे रखवालदार असलेल्या पोलिसांच्या वेतनात वाढ करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ज्या पोलिसांनी बहादुरी गाजवली त्याचे कौतुकही त्यांनी केले. बॉलकॉटला पकडल्याबद्दल १ हजार रुपयाचे पारितोषिक त्यांनी पोलिसांना दिले. वरिष्ठापासून कनिष्ठ श्रेणीपर्यंतच्या अनेक जागा रिकाम्या होत्या. त्याशिवाय पोलिसांना नोकरीत वेळेवर कायम करण्यात येत नव्हते यामुळे त्यांच्या सेवा-जेष्ठतेबद्दलचा प्रश्न डावलला जात होता. अशाप्रकारे अनेक प्रश्न बाळासाहेबांनी सोडविले.[३६]

१८०० रुपयेपेक्षा कमी उत्पन्न असणा-या पोलिसाच्या मुलांना फी माफीची सवलत बाळासाहेबांनी मिळवून दिली. सर्वांना फी माफीची १२०० रुपयांची अट असताना फक्त पोलिसांच्यासाठी ती १८०० रुपये केली. ६७ हजार पोलिसापैकी ६४ पोलिसांना या योजनाचा फायदा मिळाला. पोलिसांच्याबद्दल बाळासाहेबांची असणारी आस्था या योजनांच्यामुळे आपणास सहजरित्या त्याचे प्रत्यंतर येते.[३७]

## पोलिस उपनिरीक्षक पदासाठी ग्रामीण भागातील मुलांची भरती:-

पोलिस स्टेशनस् व पोलिसांच्या संख्येत गृहमंत्र्यांनी वाढ केली. पोलिस खात्यातील अधिका-यांच्या जागा गुणवत्तेनुसार मिळाल्या पाहिजेत यासाठी त्यांनी प्रयत्न केले. पोलिस उपनिरीक्षकांच्या जागा बाळासाहेब देसाई यांनी वाढविल्या. व जास्तीत - जास्त बहुजन समाजातील तरुण मुलांना पोलिस उपरीक्षक म्हणून नियुक्त केले . ग्रामीण भागातील तरुणांची पोलिस उपनिरीक्षक म्हणून त्यांनी केलेल्या नियुक्त्या सा-या महाराष्ट्राला परिचीत आहेत. त्यांच्या या क्रांतीकारी निर्णयामुळे ग्रामीण भागातील शेतक-यांची व गरीबांची मुले पोलिस उपनिरीक्षक होऊ शकली.

अशाप्रकारे नामदार बाळासाहेब देसाई यांनी गृहमंत्री व उपमुख्यमंत्री या पदाची कामगिरी यशस्वीरित्या पार पाडली. या पोलादी नेतृत्वाने हे अवघड जोखमीचे काम राज्यातील एकंदर परिस्थिती स्थिर नसतानाही यशस्वीपणे पार पाडले. व महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम केले, अशयाप्रकारे बाळासाहेब देसाई यांची गृहमंत्री पदाची कारकिर्द म्हणजे एका पोलादी पुरुषाची यशस्वी कारकिर्द होय.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

::: संदर्भ :::


१) साप्ताहिक ग्रामोध्दार सातारा:-सोमवार ता. १६ डिसेंबर १९६३.

२) संयुक्त महाराष्ट्र:- नामदार बाळासाहेब देसाई मान अंक:-पान नं. ४५.

३) बहुजन हिताय बहुजन सुखाय :-के.जी. सुर्यवंशी. पान नंबर २७७.

४) दैनिक नवा काळ मुंबई:- १२ मार्च १९६४.

५) दौलत:-ना. बाळासाहेब देसाई एकसष्टी सत्कार समिती अंक. पान नं. २५

६) महाराष्ट्राचे भाग्यविधाते :-ना. बाळासाहेब देसाई -सौ. सवितादेवी मिसाळ कोल्हापूर. पान नंबर- १५.

७) साप्ताहिक ग्रामोध्दार सातारा:-सोमवार ता. १३ जुलै १९६४.

८) बहुजन हिताय बहुजन सुखाय :- के.जी. सुर्यवंशी. पान नंबर-२७८.

९) दैनिक पुढारी कोल्हापूर:- १७ व 20 डिसेंबर १९६३.

१०) दैनिक लोकसत्ता:- मुंबई- २१ डिसेंबर १९६३ (अग्रलेखावरुन).

११) दैनिक पुढारी कोल्हापूर:- गुरुवार दिनांक १२ मार्च १९६४.

१२) महाराष्ट्राचे भाग्यविधाते ना. बाळासाहेब देसाई:- सौ. सवितादेवी मिसाळ. पान नंबर-१६.

१३) मुलाखत:-बी. ए. सांबरे निवृत्त डी. वाय्. एस्. पी. मुंबई. =वय=८०, दिनांक=२८-६-१९८९.

१४) दैनिक पुढारी कोल्हापूर:- ११ जुलै १९६४.

१५) डिबेट- महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह असेंब्लि , व्हॅल्यूम=२३, पार्ट=फर्स्ट, जुलै-ऑगस्ट- १९६४, पान नं. ४८०.

१६) दैनिक पुढारी कोल्हापूर-१३ ऑगष्ट १९६४.

१७) बहुजन हिताय बहुजन सुखाय:- के.जी. सुर्यवंशी. पान नं. २८५.

१८) डिबेट - महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह असेंब्लि-व्हॉल्यूम=फिफटीन, पार्ट-सेकंड, फेब्रुवारी-ऑगस्ट=१९६५, पान नं. २१०.

१९) बहुजन हिताय बहुजन सुखाय:- के.जी. सुर्यवंशी. पान नंबर-३०१, ३०२.

२०) डिबेट- महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह असेंब्लि-व्हॅल्यूम=फिफटीन , पार्ट = सेकंड , फेब्रुवारी-मार्च= १९६५. पान नं. ८२८.

२१) बहुजन हिताय बहुजन सुखाय:- के.जी. सुर्यवंशी. पान नं. ३०२.

२२) डिबेट- महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह असेंब्लि, व्हॉल्यूम=सिक्सटीन. पार्ट=सेकंड जुलै-ऑगस्ट = १९६५ पान नं. २९०.

२३) साप्ताहिक धूमकेतू:- ना. बाळासाहेब देसाई स्मृती विशेषांक-- पान नं. १३.

२४) मुलाखत:- बी.ए. सांबरे . निवृत्त डी. वाय्.एस्.पी. मुंबई. वय=८०, दिनांक- २८-६-१९८९.

२५) साप्ताहिक धूमकेतू:- वत्सलादेवी विद्यामंदिर रौप्यमहोत्सवी विशेषांक-- पान नंबर- १७.

२६) दैनिक महाराष्ट्र टाईम्स्:- मुंबई- २८ ऑगष्ट १९६६.

२७) माझा परिवार :- भाई माधवराव बागल. पान नंबर-८२.

२८) बहुजन हिताय बहुजन सुखाय:- के.जी.सुर्यवंशी. पान नं.-३०४.

२९) डिबेट:-महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह असेंब्लि, व्हॅल्यूम=२३ पार्ट=सेकंड, मार्च-एप्रिल १९६६. पान नंबर. १११४.

३०) साप्ताहिक धुमकेतू- ना. बाळासाहेब देसाई स्मृती विशेषांक- पान नंबर- १३.

३१) बहुजन हिताय बहुजन सुखाय:- के.जी.सुर्यवंशी. पान नंबर-२८७.

३२) साप्ताहिक ग्रामोध्दार सातारा सोमवार दिनांक ५-७-६२.

३३) मानवतेचा थोर नंदादीप ना. बाळासाहेब देसाई - प्राचार्य, अ.अ. मेमन. पान नंबर. ६.

३४) दौलत:- ना. बाळासाहेब देसाई एकसष्टी सत्कार समिती अंक पान नंबर २७.

३५) डिबेट- महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह असेंब्लि, व्हॅल्यूम=ट्वेनटी टू(२२) पार्ट= सेकंड, मार्च-एप्रिल १९६६, पेज नंबर- १११३.

३६) साप्ताहिक ग्रामोध्दार -सातारा सोमवार दिनांक-१३-७-६४.

३७) महाराष्ट्राचे भाग्यविधाते ना. बाळासाहेब देसाई-- सौ. सवितादेवी मिसाळ. पान नंबर- १६.